# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

**मंगळवार, दि.१७/११/२०२०**
**वेळ: १९.००**

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत १६१ कारवाया- ३६,२०० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १६.११.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत १६१ कारवाया करुन ३६,२०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** किरण सोपान वाघमारे, रा. काक्रंबा, ता. तुळजापूर हा दि. १६.११.२०२० रोजी तुळजापूर- लातुर महामार्गालग असलेल्या माऊली हॉटेलसमोर देशी- विदेशी दारुच्या १४ बाटल्या (किं.अं. १,७०८/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पो.ठा. तुळजापूर च्या पथकास आढळला. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## “चोरी.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** दत्तात्रय राम सुरवसे, रा. वागदरी, ता. तुळजापूर हे कुटूंबीयांसह दि. १५ व १६.११.२०२० रोजीच्या रात्री राहत्या घरी झोपलेले असतांना त्यांच्या घराची कडी अज्ञात चोरट्याने उचकटून घरातील १० ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख १५,००० ₹ रक्कम **तसेच** शेजारील भगतसिंग विजयसिंग ठाकुर यांच्या किराणा दुकानाचे शटरचे कुलूप तोडून दुकानाच्या गल्ल्यातील १९,००० ₹ रोख रक्कम चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या दत्तात्रय सुरवसे यांनी काल दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, शिराढोन:** लक्ष्मण दत्तु देवकर, रा. देवळाली, ता. कळंब यांच्या राहत्या घराच्या गेट- घराचे कुलूप अज्ञात चोरट्याने दि. १६ व १७.११.२०२० रोजी रात्री तोडून घरातील ४० ग्रॅम सोन्याचे दागिने, डेल कंपनीचा लॅपटॉप, डाँगल व रोख रक्कम १०,००० ₹ असा एकुण १,५०,००० ₹ चा माल चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या लक्ष्मण देवकर यांनी आज दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४५७, ३८० अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, ढोकी:** घोगरेवाडी, ता. उस्मानाबाद येथील श्री साई भारत पेट्रोलियम विक्री केंद्राच्या भुमीगत डिझेल टाकीतील ८,००० ली. डिझेल अज्ञात चोरट्याने दि. १२.११.२०२० रोजी रात्री ०१.०० ते ०५.०० वा. च्या दरम्यान नळी टाकून उपसून चोरुन नेले. अशा मजकुराच्या पेट्रोलियम विक्री केंद्र व्यवस्थापक- भाऊराव मुरलीधर भोसले, रा. निपानी, ता. कळंब यांनी आज दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “फसवणूक.”

**पोलीस सायबर ठाणे:** रविंद्र सिध्देश्वर ठोंबरे, रा. सुर्डी, ता. केज हे व्यवसायानिमीत्त दि. १३.११.२०२० रोजी कळंब येथे आले असतांना रात्री ०८.०० वा. त्यांच्या मोबाईल फोनवर कॅशबॅक ऑफर संबंधी एक संदेश आला. ठोंबरे यांनी त्या संदेशातील लिंक उघडून त्यात बँक खाते, एटीएम- डेबीट कार्ड संबंधी माहिती भरली असता त्यांच्या बँक खात्यातून ४६,००० ₹ रक्कम अनोळखी खात्यात स्थलांतरीत झाली. यानंतर एका अनोळखी व्यक्तीने २ मोबाईल क्रमांकावरुन वारंवार रविंद्र ठोंबरे यांना फोन करुन, “तुम्हाला ५,००० ₹ कर भरावा लागेल त्याकरीता तुमच्या एटीएम- डेबीट कार्डवरील तुमच्या नावाचे स्पेलींग, एटीएम- डेबीट कार्डवरील १६ अंकी क्रमांक व कार्डच्या पाठीमागील ३ अंकी सीव्हीव्ही क्रमांक ही माहिती द्या.” यावर ठोंबरे यांनी तशी माहिती देण्यास नकार देउन यापुर्वी घेतलेले ४६,००० ₹ परत करण्याची विनंती केली असता समोरील व्यक्तीने त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. अशा मजकुराच्या रविंद्र ठोंबरे यांनी आज दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४२० आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम- ६६ (सी), (डी) अन्वये गुन्हा नोंदवला असुन सायबर पोलीस ठाणे, उस्मानाबाद यांच्या मार्फत तपास केला जात आहे.

## “सुनेचा छळ, गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** रेश्मा सलीम जमादार, रा. आलूर, ता. उमरगा यांनी माहेरहुन पैसे आणावेत असा तगादा सासरकडील १)सलीम युसूफ जमादार (पती) २)युसूफ (सासरा) ३)गुलशन (सासु) ४)इस्माइल (दिर) ५)हसीना (जाउ) ६)मकतुम (चुलत सासरा), सर्व रा. आलुर (ह.मु. येरवडा, पुणे) यांनी लावला होता. त्यासाठी त्यांनी रेश्मा यांचा सन- २०१० पासुन आलुर व पुणे येथे वेळोवेळी शारिरीक- मानसिक छळ केला. अशा मजकुराच्या रेश्मा जमादार यांनी आज दि. १७.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमदू सासरकडील लोकांविरुध्द भा.दं.सं. कलम- ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** विनोद भगवान राठोड, वय २५ वर्षे, रा. घोडके तांडा, खुदावाडीख् ता. तुळजापूर हे मो.सा. क्र. एम.एच. २५ एपी ६५०२ ने दि. १५.११.२०२० रोजी १७.०० वा. सु. बाभळगांव शिवारातील नळदुर्ग- सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वरुन प्रवास करत होते. प्रवासादरम्यान ट्रक क्र. एन.एल. ०१ एसी ०२६८ च्या अज्ञात चालकाने ट्रक निष्काळजीपणे चालवून विनोद राठोड यांच्या मो.सा. ला. पाठीमागून धडक दिल्याने या अपघातात विनोद राठोड हे गंभीर जखमी होउन मयत झाले. अशा मजकुराच्या विजय जगन्नाथ राठोड, रा. घोडके तांडा यांनी काल दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, बेंबळी:** चालक- युवराज सुखदेव राठोड, रा . जहागिरदारवाडी, ता. उस्मानाबाद यांनी दि. २७.१०.२०२० रोजी १९.०० वा. सु. कनगरा शिवारातील रस्त्यावर मो.सा. क्र. एम.एच. २५ एआर १६५१ ही निष्काळजीपणे चालवून धन्यकुमार गेनदेव सिध्देश्वर, वय ५० वर्षे, रा. कनगरा, ता. उस्मानाबाद हे चालवत असलेल्या मो.सा. क्र. एम.एच. १३ एएच ९१४३ ला समोरुन धडक दिली. या अपघातात धन्यकुमार

सिध्देश्वर हे गंभीर जखमी होउन मयत झाले. अशा मजकुराच्या विशाल धन्यकुमार सिध्देश्वर यांनी काल दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९, ३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** चालक- भुषण प्रकाश भारसाखळे, रा. चिकलठाण, औरंगाबाद यांनी दि. १३.११.२०२० रोजी १७.१५ वा. सु. तुळजापूर येथील भारतीबुवा मठाजवळील रस्त्यावरील पुलावर मिनीट्रक क्र. एम.एच. २० ईजी ६४७० हा निष्काळजीपणे, हयगईने चालवून समोरील वाहनास धडक दिल्याने स्वत: गंभीर जखमी झाले. यावरुन पो.ठा. तुळजापूर चे पोना महादेव सुडके यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद चालकाविरुध्द भा.दं.सं. कलम- २७९, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**“मारहाण.”**

**पोलीस ठाणे, उमरगा:** महेश नागे व सचिन नागे, रा. भिमनगर, उमरगा या दोघांना दि. १५.११.२०२० वा. सु. उमरगा येथील सरकार हॉटेलच्या पाठीमागे १)व्यंकट पवार २)ओमकार धोत्रे ३)रोहित पवार ४)राम पवार ५)आकाश कऱ्हाडे ६)तेलंग, सर्व रा. उमरगा हे सर्वजण जुन्या वादातून मारहाण करत होते. हा प्रकार बघुन नागे यांच्या गल्लीत राहणाऱ्या बालाजी पांडुरंग सुरवसे यांनी महेश व सचिन नागे यांच्या बचावाचा प्रयत्न केला असता त्यांनी बालाजी सुरवसे यांनाही शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, लोखंडी तराजुने मारहाण करुन जखमी केले व ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या बालाजी सुरवसे यांनी काल दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, शिराढोन:** सुशालाबाई बालासाहेब गायकवाड, रा. सौदना (आंबा), ता. कळंब यांना दि. १६.११.२०२० रोजी १७.०० वा. सु. सौदना (आंबा) शेतशिवारात सामाईक शेतबांधावरुन रहदारीच्या कारणावरुन गावकरी- १)शंकर गायकवाड २)सुदर्शन गायकवाड ३)सुशिल गायकवाड ४)मिनाबाई गायकवाड या चौघांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले व ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या सुशालाबाई गायकवाड यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** रफीक अब्दुल शेख, रा. मुळज, ता. उमरगा यांना दि. १५.११.२०२० रोजी २२.०० वा. सु. त्यांच्या राहत्या घरासमारे पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरुन गावकरी- समाधान शहाजी जमादार व प्रेमनाथ जमादार या दोघा भावांनी शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली. यात रफीक शेख हे खाली पडल्याने त्यांच्या उजव्या डोळ्याजवळ दुखापत झाली. तसेच रफीक यांच्या पत्नी, आईसही शिवीगाळ करुन ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या रफीक शेख यांनी काल दि. १६.११.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**